# कामाचे नाव :- विवाह नोंदणी

| टप्पा क्रमांक | पद | करावयाचे काम | आवश्यक कागदपत्रे | कलम | कामाला लागणारा वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सि ग्रेड लेखनिक | विवाह नोंदणी फॉर्म ड ची विक्री करणे वधू किंवा वर यांपैकी एकजण विवाह नोंदणीसाठी आल्यानंतर त्यांना रू १०४ चा फॉर्म दिल्यानंतर त्याची स्वाक्षरी घेणे व त्याचा भरणा मनपा टेझरीत करणे | वधु वर यांचे जन्मतारखेचे प्रमाणपत्रे त्यांचे रहाण्याचा पत्ता तीन साक्षीदारांचे रहाण्याचे पत्ते वधू वर व साक्षीदार यांचे आयकार्ड साइज फोटो व लग्नपत्रिका व लग्नपत्रिका नसेल तर रू १००च्या कोर्ट फी स्टँपवर ॲफिडेव्हिट करणे | महाराष्ट विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ | त्वरित | |
| २ | | वधु किंवा वर अथवा साक्षीदार यांपैकी एक जण फॉर्म भरून घे न आल्यानंतर तो व्यवस्थित भरला आहे किंवा नाही याची खात्री करणे कागदपत्रे व्यवस्थित जोडली आहेत किंवा नाही हे पाहणे व सर्व कागदपत्रे सत्यप्रती आणल्या आहेत किंवा नाही ते पाहणे वधुचे वय १८ व वराचे वय २१ असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तपासून पाहणे साक्षीदारांचे वय हे वधू व वरांच्या लग्नाच्या तारखेनुसार वय वर्ष २१ पुढील असणे आवश्यक आहे ते तपासून पाहणे फॉर्म तपासून झाल्यानंतर त्यांना तारिख व वेळ देणे विवाह नोंदणी ही दर बुधवार व शुक्रवार या दोन वारी करण्यात येते. | | | २४ तास | |
| ३ | | वधु वर व तीन साक्षीदार कार्यालयात आल्यानंतर वधु व वर यांची माहिती संगणकावर भरणे व त्याच्या प्रती काढणे पहिली प्रत प्रमाणपत्रे दुसरी प्रत गोषवारा भाग १ तिसरी प्रत गोषवारा भाग-२ चौथी प्रत फी भरणे विषयी पावती अशा चार प्रतीत प्रमाणपत्र काढल्यानंतर कार्यालयीन प्रमाणपत्रावर वधु व वराची सही घेणे . गोषवारा भाग -१ वरही वधु व वराची स्वाक्षरी घेणे गोषवारा भाग-२ वर साक्षीदारांची स्वाक्षरी व पुरूष असेल तर डाव्या हाताचा अंगठा घेणे व स्त्री साक्षीदार असेल तर उजव्या हाताचा अंगठा घेणे व त्यानंतर मा. क्षेत्रिय अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे व प्रमाणपत्र संबंधित वधु व वर यांना देणे. विवाहनोंदणी फी ची रक्कम दंडाची रक्कम चलनाने शासकीय कोषागारात भरणे. | | | २४ तास | |
| ४ | क्षेत्रिय अधिकारी | वरीलप्रमाणे तपासणी झालेल्या कागदत्रावर साक्षीदार व वधू वर यांची ओळख तपासून प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करणे. | | | २४ तास | |